| MHAK070002002023 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.०६/२०२३ मधील</u>**<br>**<u>निशाणी ५ वरील आदेश</u>**<br>कपीला ठाकरे  विरुध्द मधुकर पारसकर<br>(दिनांक १६ जानेवारी, २०२४) |
|---|---|

१.  प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल केलेला आहे.

२.  वादपत्रातील परिच्छेद क्र.१ मध्ये वर्णन केलेली मौजे मांजरी तालुका बाळापूर, जिल्हा अकोला येथील **भुमापन क्र.२०९, क्षेत्रफल ११ हेक्टर ५४ आर पैकी २ हेक्टर ८१ आर** ही मिळकत दाव्याचा मुख्य विषय असून यापुढे सदर मिळकतीला "दावामिळकत" असे संक्षिप्तरित्या संबोधण्यात येईल.

३.  वादी यांच्या कथनानुसार, वरील नमुद दावामिळकत ही वादींचे वडील त्र्यंबक सिताराम पारसकर यांचे मालकीची होती. त्र्यंबक सिताराम पारसकर हे दिनांक ३०.०३.२००३ रोजी मरण पावले. त्यांच्या मृत्युनंतर वादींची  आई – विजयादेवी त्र्यंबक पारसकर व वादी यांचेकडे दावामिळकत वारस हक्काने आली व ते दावामिळकतीची वहिवाट करु लागले. वादींचे आईवडीलांच्या मृत्युनंतर मौजे मांजरी येथे जावून शेतीची वहिवाट करु लागले. वादी यांना सौ. विजयश्री सुर्यभान बेरड या नावाची बहिण आहे. वादींचे वडील त्र्यंबकराव सिताराम पारसकर हे मयत झाल्यानंतर दावामिळकत ही वादींच्या नावे महसुल दप्तरी नोंदविण्यात आली व त्यामुळे दावामिळकत ही वादी व त्यांची बहिण सौ. विजयश्री सुर्यभान बेरड यांच्या सामाईक मालकीची आहे.

४.  प्रतिवादी हे वादीचे चुलत भाऊ असून दावामिळकतीच्या उर्वरीत क्षेत्रात त्यांचे मालकीची ८ हेक्टर ७३ आर शेती आहे. वादी व प्रतिवादी या दोघांचीही त्यांचे मालकीच्या शेताबाबत वेगवेगळी वहिती असून वादी आणि प्रतिवादी यांच्या शेताचा एकमेकांशी कोणताही संबंध नाही. सोईप्रमाणे वादी दावामिळकतीमध्ये वहिवाट करतात. दावामिळकतीची वहिती, देखरेख करण्याकरीता, त्याबाबतचे कोणतेही व्यवहार व

कोणतीही न्यायालयीन कार्यवाही करण्याचे अधिकार विशेष मुखत्यारपत्राद्वारे दिनांक ३०.०९.२०२१ रोजी वादी क्र.३ ते ६ यांनी वादी क्र. १ व २ यांना दिले आहे.

५. वादींचे वय झाल्यामुळे त्यांना दावामिळकतीमध्ये जावून वहिवाट करणे शक्य होत नसल्याने वादींनी दावामिळकतीची विल्हेवाट करण्याकरीता दावामिळकतीची अंदाजित किंमतीची चौकशी करण्याकरीता वादी क्र.१ व २ हे मौजे मांजरी येथे दिनांक १५.११.२०२२ रोजी गेले होते. त्यावेळी प्रतिवादीने शेतात येवून दावामिळकतीची कोणत्याही प्रकारे या पुढे वहिती करु देणार नाही किंवा त्यांची विल्हेवाट लावू देणार नाही. वादी हे वयोवृध्द असल्यामुळे प्रतिवादी जबरदस्तीने वादीकडून दावामिळकतीचा ताबा घेतील या भितीमुळे वादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी यांना समाजवून सांगण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु प्रतिवादी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते म्हणून वादी यांनी प्रतिवादी यांना दावामिळकतीमध्ये वादींच्या ताबेवहिवाटीस हरकत, अडथळा करु नये म्हणून वकील श्री. आर.एस.ठाकरे यांचेमार्फत दिनांक १७.११.२०२२ रोजीची नोटीस पाठविली. नोटिस मिळून देखील वादी क्र.१ व त्यांचे पती हे दिनांक १७.०१.२०२३ रोजी मांजरी येथे गेले असता प्रतिवादी यांनी वादींच्या ताब्यास अडथळा केला व पुन्हा मांजरी येथे येवू नये, अशा प्रकारे धमकी दिली. म्हणून वादी यांना प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा व अर्ज दाखल करणे भाग झाले.

६. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी होवून देखील प्रतिवादी हजर राहिले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला.

७. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. ठाकरे यांचा युक्तिवाद ऐकला.

८. वादी यांच्या विधानांवरून खालील प्रश्न विचारार्थ येतात. सदर प्रश्नांची उत्तरे सुसंगत कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नमूद केलेली आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथमदर्शनी बाजू सिद्ध केली आहे का ? | **होय.** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का ? | **होय.** |
| ३. | वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का ? | **होय.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता –**

**९.** वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे निष्कर्षाची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रितपणे विचारात घेतलेले आहेत.

**१०.** तुर्तातुर्त मनाई आदेश देणे अथवा नाकारणे हा न्यायालयाचा ऐच्छिक अधिकार आहे. सदरील ऐच्छिक अधिकार हा कायद्याने नेमून दिलेले निष्कर्ष व तत्वे यांचा विचार करुनच वापरावा असे मा. ना. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. ना. उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी विविध न्यायनिर्णयातून मार्गदर्शक तत्वे देऊन सुचविलेले आहे. तुर्तातुर्त मनाई अर्जाचा विचार करताना वादीने त्याचे प्रकरण प्रथमदर्शनी असल्याचे सिद्ध केले आहे काय, तसेच न्यायाचा झुलता तोल वादीच्या बाजुने आहे काय व तात्पुरत्या मनाई हुकूमाची दाद नाकारल्यास वादीचे पैशात भरुन न येणारे नुकसान होण्याचा संभव आहे काय अशा मुख्यत्वे तीन बाजू तपासाव्या लागतात. याउपरांत, तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज निर्णित करताना न्यायालयाने दोन्ही पक्षांची वर्तणूक सुद्धा विचारात घेतली पाहिजे.

**११.** वादी यांनी त्यांचे कथनापृष्ठर्थ अर्ज प्रतिज्ञापत्रासह सादर केलेला आहे. वादी यांनी नि.४ यादीसोबत दावामिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची प्रत, गाव नमुना ८अ खाते क्र.४७० ची प्रत, दिनांक १७.११.२०२२ रोजी पाठविलेली कायदेशिर नोटीस, पोष्टाच्या पावत्या दाखल केलेल्या आहे. याउपरांत दिनांक ३०.०९.२०२१, २७.०८.२०२१, ०९.०९.२०२१ आणि १४.०९.२०२१ रोजीच्या प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी वादी क्र.१ व २ च्या लाभात करुन दिलेल्या विशेष कुलमुखत्यार पत्राच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. सदर कागदोपत्री पुराव्यांचा संदर्भ यापुढे आवश्यक त्या ठिकाणी घेण्यात येईल.

**१२.** वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकत वादी यांची सामाईक मालकी ताबेवहिवाटीची वारस हक्काने मिळालेली मिळकत आहे. परंतु प्रतिवादी त्यांचे चुलत भाऊ व लगतचे कब्जेदार असून वादी यांच्या शांततेमय ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करतात.

**१३.** तुर्तातुर्त मनाईचा आदेश करतेवेळी दावा मिळकतीची कब्जेवहिवाट महत्त्वाचा मुद्दा असतो. त्यामुळे दावा मिळकतीची ताबेवहिवाट कोणाकडे आहे ते पाहणे आवश्यक आहे. अभिलेखावरील दावा मिळकती संदर्भातील वादी यांनी दाखल केलेले दि. २०.०५.२०१७ रोजीचे ७/१२ उता–यावर (नि.४/१) वादी यांची नावे कब्जेदार सदरी दिसून येत आहे. गाव नमुना ८अ उताऱ्यावरुन वादी क्र.१ ते ६ यांची खाते क्र.२७० अन्वये सामाईक वहिवाट दिसून येते. विशेष कुलमुखत्यार पत्राद्वारे वादी क्र.३ ते ६ यांनी त्यांचे दावामिळकती संदर्भातील अधिकार प्रतिवादी क्र.१ व २ यांना दिल्याचे प्रथमदर्शनी निर्दशनास येते.

**१४.** प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर मनाईसाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादीने दावामिळकतीमधील वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करु नये, अशी अंतरीम मनाईहुकूमाच्या अर्जात विनंती केलेली आहे. त्यासंदर्भात दावा दाखल करणेपुर्वी वादीने प्रतिवादी यांना कायदेशिर नोटीस (नि.क्र.४/३ ते ४/५) पाठविल्याचे कथन केलेले आहे. सदर नोटीस मिळून देखील प्रतिवादी यांनी वादींच्या शांततेमय ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करणे थांबविले नाही म्हणून वादीने दावा दाखल केल्याचे देखील शपथेवर कथन केलेले आहे.

**१५.** दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ३९ नियम १ अन्वये कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरुन किंवा अन्यथा –

(क) एखाद्या दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा **दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडून अपव्यय केला जाणेचा, तिचे नुकसान केले जाणेचा किंवा ती हस्तांतरीत केला जाणेचा धोका असल्याचे** सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला दावा निकाली होईपर्यंत अशी कृती निरुध्द करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाईहूकूम देता येईल.

१६. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी वादी यांच्या दावामिळकतीमधील ताबेवहिवाटीस हरकत अडथळा केला. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे वादीने शपथेवर प्रतिवादी यांनी दावामिळकतीतून बेदखल करण्याची धमकी दिलेली असल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादी यांनी गैरहजर राहून वादीच्या पुराव्यास आव्हान दिलेले नाही. त्यामुळे वादीचा पुरावा अबाधित राहिलेला आहे. एकंदरीत वादीचे कथन व अभिलेखावरील पुरावा पाहता वादीची बाजू प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी यांनी दावामिळकतीमध्ये हरकत अडथळा केल्यास किंवा वादी यांना बेदखल केल्यास वादींचे अपरीमित असे पैश्याने कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूमाचा आदेश दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असून मनाईहुकूम न दिल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे असे माझे मत बनले आहे. सबब, मी प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित असून प्रश्न क्र.४ चे उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी किंवा त्यांचेमार्फत इतर कोणीही दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत वादींच्या दावामिळकतीमधील शांततेमय ताबे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये, असा तुर्तातुर्त मनाईहूकूमाचा आदेश देण्यात येतो.

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.

दिनांक : १६/०१/२०२४.
ठिकाणः बाळापूर

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Date of Decision | :- | 16.01.2024 |
| Order signed by P.O on | :- | 16.01.2024 |
| Order uploaded on | :- | 16.01.2024 |